REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# सूत्रपाठ आणि दृष्टांतपाठातील मूल्यात्मकता

**प्रा.डॉ.पद्माकर आ.पिटले**
**मराठी विभाग प्रमुख , श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालय,उमरगा.**

## प्रास्ताविक :-




साहित्य मूलत: काही तरी चांगल्या गोष्टी सांगण्यासाठी निर्माण झाले आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, साहित्य या शब्दाचा अर्थच मूळात ' सहित सांगणारे ते साहित्य ' असा होता. साहित्याने समाजावर विशिष्ठ असे संस्कार करावेत अशी अपेक्षा आपोआपच व्यक्त होताना दिसते. लेखकाची सामाजिक जबाबदारी आहे की, त्यांनी आपल्या साहित्यातून मूल्यनिष्ठ असा समाज निर्माण करण्यास मदत केली पाहिजे. जी संकल्पना माणसांना, विश्वातील समग्र घटकांसाठी हितावह व सुखावह ठरेल असे वर्तन करण्याची शिकवण देते त्या संकल्पनेला मूल्य असे म्हणता येईल. रुढार्थाने व्यापकपणे त्याला जीवनमूल्ये म्हटल्यास वावगे ठरणार नाही. १२ व्या शतकात उदयाला आलेल्या महानुभाव पंथाने खऱ्या अर्थाने समाजात समानतेचा जो धागा पकडला असून त्यातून खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांती घडली आहे. या पंथाविषयी शं.गो. तुळपुळे म्हणतात, ' 'महाराष्ट्रात महानुभाव या नावाने प्रसिध्द असलेला हा पंथ दिल्ली-पंजाबकडे जयकृष्णी पंथ म्हणून ओळखला जातो. त्याची स्थापना चक्रधरस्वामींनी इसवीसनाच्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात केली. महानुभाव मत हे एक व्दैती मत असून त्यानुसार जीव, प्रपंच व देवता यांपासून पूर्णपणे स्वतंत्र असणारा एक नित्यमुक्त परमेश्वरच मोक्ष देण्यास समर्थ आहे. 'सृष्टीमध्ये कवणे करणे मुंचिजेना एके परमेश्वरविण हे चक्रधराच्या सूत्रपाठातील पहिले सूत्र म्हणजे महानुभाव तत्वज्ञानाचा पायाच असल्यामुळे त्या परमेश्वराची भक्ती करून त्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे हे या पंथाचे एकमेव साध्य आहे, "[i] तसेच भक्ती या मूल्यासोबतच या काळात अहिंसा, सदाचार, करूणा, सत्य, क्षमा, नम्रता, औदार्य, भूतदया व सेवाभाव आदी मूल्यांचा पुरस्कार या काळातील संप्रदायाने केलेला होता. लौकीक जीवनात जी मूल्ये जोपासली जात होती त्याविरूध्द बंड पुकारण्याचे काम सर्वज्ञ चक्रधरांनी आपल्या तत्वज्ञानातून केले आहे. त्याकाळात स्त्री ही केवळ उपभोगाचे साधन झाली होती. त्या स्त्रीला धर्मसाधनेचा अधिकार महानुभाव पंथाने मिळवून दिला. समाजातील चारही वर्णांना धर्मसाधनेचा अधिकार आहे. बहुजनांना धर्मसाधनेचा अधिकार मिळवून देण्यासाठी कठीबध्द असणारे महानुभाव पारंपरिक मूल्याविरोधी भूमिका घेवू शकले नाहीत हे मात्र या ठिकाणी मान्य करावे लागते. महानुभाव संप्रदायाची आचारसंहिता ज्या दोन ग्रंथातून प्रकट होते त्या सूत्रपाठ आणि दृष्टांतपाठ यातून प्रकट होणाऱ्या मूल्यांचा विचार खालीलप्रमाणे केला आहे.

## सूत्रपाठ :-

महानुभावियांचे संपूर्ण साहित्य हे पंथीय प्रेरणेतून निर्माण झाले आहे. कुठल्याही धर्मात, पंथात त्यांचे स्वतंत्र तत्वज्ञान अस्तित्वात असते. त्या त्या धर्मप्रवर्तकाने निरनिराळया ठिकाणी केलेली व्याख्याने, संवाद एकत्र ग्रंथीत करण्यात येतात व कालांतराने त्यातील तात्त्विकतेचा भाग दुसऱ्या एका स्वतंत्र ग्रंथात एकत्रित करून त्याला तत्वज्ञानाचे स्वरूप येत असते. त्या काळीही ती पध्दत रूढ होती. वीरशैव संप्रदायाचा 'शून्य संपादिनी' यातून पुढे बस्वेश्वरांचे 'बसववचनामृत' या नावाने प्रसिध्द झाले आहेत. तसेच गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानाचे सार ज्यात मिळते तो ग्रंथ म्हणजे 'धम्मपद' या ग्रंथाचे असेच. भागवतातील निरनिराळया ठिकाणी विखुरलेले भगवान श्रीकृष्णांच्या मुखीची वचने महर्षी व्यासांनी सूत्रबध्द ओवून 'श्री गीता' तयार केली. तद्वतच महानुभाव संप्रदायचे आपले सर्वज्ञ श्री स्वामी चक्रधर यांच्या मुखातील जे तत्वज्ञान बाहेर पडले ते केशिराज व्यासांनी एकत्र करून १२१२ च्या सुमारास म्हणजे ज्ञानेश्वरीच्या जन्मकाळी पूर्ण केले. लीळाचरित्रातील श्रीमुखीची वचने निवडून त्यांचे वर्गीकरण करून त्याचा परस्परांशी अन्वय लावून आचार्याच्या मार्गदर्शनाखाली हा ग्रंथ सिध्द केला आहे.

प्रत्येक धर्माच्या धर्मग्रंथात या सृष्टीचे गूढ जाणून घेण्याचा प्रयत्न सर्वच ग्रंथकारांनी केला आहे. याला अपवाद फक्त धम्मपद म्हणता येतील. सूत्रपाठामध्ये महानुभाव तत्वज्ञानाचे भांडार आपल्याला खूले करून देण्याचे कार्य केशिराज व्यासांनी केले आहे. यासंदर्भात डॉ.रमेश आवलगावकर म्हणतात,'' संसरणा पासून तो संहरणा पर्यत आणि पूर्वीपासून (म्हणजे विश्वाची आद्यावस्था) तो जीव उध्दरणापर्यंतची महत्वपूर्ण मौलिक तत्वे सूत्रपाठात सांगितली असून हा सूत्रपाठ अलौकिक कोटीतलाच!,"[ii] थोडक्यात सूत्रपाठात जीवनाचे सारेच तत्वज्ञान आले आहे. महानुभाव साहित्यातील मूल्यांचा गाभाच मूळात सूत्रपाठात आपल्याला मिळू शकतो. सूत्रपाठात एकूण सोळा प्रकरणात विभागलेली १२५० सूत्रे असून त्यातील असतीपरी, आचार, आचारमाळिका तसेच विचार व विचारमाळिका यातील सूत्रे तत्कालिन मूल्यांची गंगोत्री होवू पाहत आहेत.

महानुभावांचे सर्व वाङ्मय त्यांच्या पंचकृष्णाभोवती निर्माण झालेले आहे. त्यामध्ये पंथीय प्रेरणा असून भक्तीच्या माध्यमातून या साहित्याची निर्मिती झाली आहे. त्यामुळे त्यांचा पंचकृष्णविचार समजावून घेणे गरजेचे आहे. हे पंचकृष्ण कोणते ते चक्रधरांच्या सूत्रपाठात प्रारंभीच सांगितले आहे.

'' जैसे व्दापरीं श्रीकृष्णचक्रवर्ती ||१|| जैसे सैहाद्रीं श्रीदत्तात्रेय प्रभु ||२|| जैसे व्दारावतीए श्रीचांगदेवो राउळ||३|| जैसे ऋव्दिपुरी श्रीगुंड राउळ||४|| जैसे प्रतिष्ठानी श्रीचांगदेवो राउळ||५||"[iii] या पंचकृष्णाचा विचार महानुभावांनी भक्तीच्या माध्यमातून केली आहे. महानुभावांचा सूत्रपाठ म्हणजे त्याचा तत्वज्ञान निरूपण करणारा आधारभुत असा ग्रंथ आहे याचे श्रेष्ठत्व प्रकट करताना तुळपुळे म्हणतात,'' सूत्रपाठ म्हणजे चक्रधरस्वामींची वाङ्मयी मूर्ती असून महानुभाव पंथीयांचा तो शास्त्रवचनरूप परमेश्वर आहे,"[iv] थोडक्यात हा ग्रंथ तात्त्विक असा असून महानुभाव तत्वज्ञानाचा तो पाया आहे. थोडक्यात तो वचनरूपी परमेश्वरच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

चक्रधरोक्त सूत्रपाठातून प्रामुख्याने भक्ती, सर्वधर्मसमभाव, कर्तव्यनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, राष्ट्रभक्ती, श्रमप्रतिष्ठा इत्यादी मूल्यांचा आविष्कार होताना दिसतो. या सगळयाच मूल्याचा विचार पुढील सूत्रांच्या आधारे असा-

'' एकी कोठाचे बैल भांडतिः जुंझेतिः परि कुस लावुनि बैसेतिः|| "[v] प्रस्तुत सूत्र हे आचारमालिकेतील असून सर्वानी गुण्यागोविंदाने रहावे अशी भूमिका चक्रधरांनी मांडली आहे. विश्वबंधुत्वाची जाणीव, बंधुता या सूत्रातून प्रकट होताना दिसते आहे. थोडक्यात याच सूत्रातून राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रभक्ती ही मूल्ये प्रकट होताना दिसतात. त्याचबरोबर,'' विजना जातां : जैसा काही खळिये बैसावेया नेइजाताएः||"[vi] या सूत्रातून निर्धार, ध्येयवाद,चिकाटी तसेच त्याग इत्यादी शाश्वत मूल्यांचा उत्कृष्ट परिपोष या सूत्रातून होताना दिसतो. त्याचबरोबर'' पोळलेया सुनेयाचेया परी असावे :|| "[vii] या सूत्रातूनदेखील सर्वसंगपरित्याग या मूल्याचा आविष्कार होताना दिसतो. जीतेनि मृताचां धर्मी वर्तावे , लोहें पाणी गिळिले एसें होउनि असावे :|| यातून त्याग हे शाश्वत मूल्य प्रकट होताना दिसते आहे.

महानुभाव पंथात स्त्रीयांना धर्मसाधनेचा अधिकार दिलेला असला तरी सूत्रपाठात मात्र स्त्रीपुरूष समानता हे मूल्य न पाळता त्याचा मूल्याभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सूत्रपाठातील अनेक सूत्रातून स्त्रीयांचा अवमान करण्याचा प्रयत्न झालेला आहे. ' स्त्री भणिजे मेंढियेचे खाजें गा:||, स्त्री भणिजे मत्त द्रवाचा रावो गा:||, चित्रिची स्त्री न पाहवीः|| स्त्री दर्शने माजवी : द्रव्य अस्तित्वे माजवी :||' आदी सूत्राच्या माध्यमातून स्त्रीयांचे अवमूल्यन केले आहे. या मूल्याभासामागे निश्चितच स्त्रीयांकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन आपल्याला लक्षात येतो. या सूत्राचा विचार करताना आपल्याला असे लक्षात येते की, स्त्री धर्मसाधनेचा अधिकार मिळाला पण तिची अवहेलना समाजात केली जाते आहे. पुरूषासंदर्भात मात्र असले कोणतेही सूत्र या सूत्रपाठात येताना दिसत नाही. थोडक्यात स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन पारंपरिक असला तरी धर्मसाधनेत तिला सामावून घेतले जात होते. इतर धर्माप्रमाणे तिचा उपभोग्य वस्तु म्हणून तिचा वापर या पंथात होताना दिसत नाही.

सूत्रपाठातील अनेक सूत्रातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या सामाजिक मूल्यांची जाणीव होताना दिसते आहे.'' महारवाडौनि धर्मु काढावा :|| "[viii] या सूत्रातून सर्वधर्मसमभावाची जाणीव होताना दिसते आहे. त्याचबरोबर जाती समानतेचे तत्व पाळलेले दिसते. धर्माचा अधिकार सर्व जातीला आहे. विशिष्ठ अशा वर्गालाचा धर्माचा अधिकार नसावा हे भूमिका या सूत्राच्या मागे आहे. भूतदया, त्याग, निष्ठा व सौजन्यशीलता या मूल्यांचा परिपोष सूत्रपाठातून होताना दिसतो आहे. ' मुक्तीची चाड : तेणे मुंगिये वीरुं न चिंतावे, तमचैनि मुंगी रांड न होआवि, प्राणासि आहारु देयावाः इंद्रियांसि नेदावाः||' अशा अनेक सूत्रातून शाश्वत मूल्ये प्रकट होताना दिसतात. सूत्रपाठ म्हणजे त्याकाळातील समाजाचे नीतीशास्त्राचे पुस्तकच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## दृष्टांतपाठातील मूल्ये :-

दृष्टांतपाठाची रचना ही शके १२१४ मध्ये झाली. दृष्टांतपाठ म्हणजे जीवनाचे अनाकलनीय असे तत्व आकलनसुलभ व्हावे यासाठी नित्याच्या अनुभवातील जे दाखले दिले जातात त्यास दृष्टांत असे म्हणतात. जीवनाचे अनाकलनीय तत्वज्ञान समजावून सांगण्यासाठी दिलेला दाखला म्हणजे दृष्टांत होय. दृष्टांतपाठात ११४ दृष्टांत असून त्यांचे कथामूल्य महत्वाचे आहे. कथनरूपाने जीवन जगण्याचे तत्वज्ञान स्वामी चक्रधर या दृष्टांतपाठातून सांगण्याचे काम केले आहे. या ग्रंथाचे कर्तत्व केशिराज व्यासाकडे जाते. एकंदरित दृष्टांतपाठातील विचार करताना आपल्याला प्रामुख्याने खालील मूल्यांच्या आधारे त्याचा विचार करावा लागतो.

## वैज्ञानिक दृष्टिकोन :-

दृष्टांतपाठातील अनेक दृष्टांतातून वैज्ञानिक दृष्टिकोन प्रकट होताना दिसतो आहे. सोमकांताचा दृष्टांत असा आहे की,῾῾चंद्राचा रश्मी करूनि सीळापाषाण||: रामे :||लता गुल्मे नीवतिः पर द्रवतिनाःतैसा सोमकांत नव्हे : तो द्रवे ||"[ix] या दृष्टांतात श्री स्वामी चक्रधरांनी सोमकांत नावाच्या पाषाणाचे उदाहरण दिले आहे. ज्याप्रमाणे चंद्राच्या शीतल किरणांनी शिळापाषाण थंड होतात पण द्रवत नाहीत मात्र सोमकांत नावाचा पाषाण चंद्राच्या शीतल किरणानीही पाझरतो. असा वैज्ञानिक दृष्टिकोन समाजाला देण्याचे काम स्वामी चक्रधर करताना आपल्याला दिसतात. त्याचबरोबर डोळेयाचा दृष्टांतातून दृष्टीचे प्रकार सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. डोळयाच्या ठिकाणी दोन प्रकारची सामग्री असते. एक म्हणजे तेज सामुग्री आणि दुसरी म्हणजे मेद सामुग्री . वज्रकिटकीएचा दृष्टांतातून विविध असाध्य रोगाचा शोध लावण्याचा प्रयत्न चक्रधरांनी केला आहे.῾῾ कव्हणा एका अंताचीए सवडी वज्रकीटकी लागली असेः ते आगी जळेनाः पाणिये बुडेनाः शस्त्रे छेदेना :घणवरि पीटिता मरेनाः "[x] या दृष्टांतातून आजच्या परिभाषेतील कॅन्सर सारख्या दुर्धार रोगाविषयीची माहिती चक्रधरांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच वनस्पतीशास्त्राचे परिपूर्ण ज्ञान चक्रधर आपल्याला वटबीजाच्या दृष्टांतातून देतात. वटवृक्षाच्या बीजामध्येच शाखोपशाखी अर्थात फांद्या पाने, फळे यासह बहरणाऱ्या वडाची समृध्दी असते. भूमी आणि पाणी याचा योग जुळून येताच त्याचा बीजाचे विशाल असा वटवृक्षात रूपांतर होते. तसेच कानवाथराचा दृष्टांतातून दगडाच्या प्रकाराची चर्चा करताना दिसतात. वेळुवाच्या दृष्टांतात ते म्हणतात,῾῾ चंदनाचिया जवळीका आरी :बोरी : टाकळी : वेहंकळी :पाडळी वेधतिः पर वेळुन वेधें : का : तो भीतरी पोकळ असे तथा अंतरसार नव्हे:||"[xi] चंदनाच्या झाडाला सर्व झाडे वेधतात मात्र वेळू आतून पोकळ असल्यामुळे त्याच्या ठिकाणी वेधण्याचा क्षमता नाही असे सर्वज्ञानी चक्रधर म्हणतात. त्याचबरोबर 'कोवळया वाळुकाचा' आणि इंद्रवणाच्या दृष्टांतातून फळाचा गुणधर्म सर्वज्ञानी सांगितले आहे. त्याचबरोबर 'रोवंतलैया पशुचा' दृष्टांतात प्राण्यांच्या रवंथाच्या क्रियेचे शास्त्रीय महत्व सांगितले आहे. फुटाणेकाराच्या दृष्टांतात फुटाणे बनविण्याची शास्त्रीय प्रक्रिया सांगितली आहे. 'वर्तेच्या' दृष्टांतात एकाग्रतेचे वर्णन केलेले आहे.

**श्रमप्रतिष्ठा :-**

दृष्टांतपाठातून अनेकवेळा श्रमाचे महत्व सांगणारे दृष्टांत येत असतात. या दृष्टांतामागे भक्तीची जरी संकल्पना असली तरी सामाजिक जीवन जगत असताना जीवनात श्रमाला अनन्यसाधारण असे महत्व निर्माण होताना आपल्याला दिसते. 'हिरेखाणियाच्या' दृष्टांतात श्रमाचे महत्व सांगण्यात आले आहे,῾῾ कव्हणी एक हीरेयाची खाणि खणतिःखणतखणता खांब राखतिःवोदरे तेथ मध्ये टेका सुतिः तयासि षट्कोनि हीरा सांपडेः एकासि हीरकणी सांपडेः एक नसुधा रीगेःनीगेः एकावर दरड पडे||"[xii] थोडक्यात ज्याचा जसा प्रयत्न असेल त्या प्रमाणे फळे मिळतात. दृष्टांतपाठात श्रमाचे महत्व सांगण्यामागे भक्तीचे तत्वज्ञान असले तरी श्रमाचे महत्व सांगणे त्याकाळात अपरिहार्यच झाले होते. वेवाच्या दृष्टांतातून एका साळी (कोष्टी) याचा प्रमाणिकपणा आणि श्रमाचे महत्व सांगितले आहे. तणधैलेया बावराचा दृष्टांतातून शेतीला मशागतीची किती गरज आहे हे सांगण्यात आले आहे. सुरीयेचा दृष्टांतात लोहाराच्या कार्यकुशलतेचा नमुना देण्यात आला आहे. आयचग्रासेच्या दृष्टांतात,῾῾ कव्हणी एक आयाच्याग्रासी असः तयासी कव्हणी एक घास सुयेःतेणे चाववा गिळावा इतुलेची पर धातु नेते ते आणिक असे||"[xiii] या जीवनात आयते काहीच मिळत नाही कष्टाला पर्याय नाही हेच मूल्य यातून प्रकट होताना दिसते.अधारीचेया परीसाचा दृष्टांतातून श्रमाची प्रतिष्ठा सांगण्यात आली आहे.

**भूतदयाः-**

दृष्टांतपाठातील अनेक दृष्टांतातून भूतदया हे मूल्य दिसून येते. प्राणीमात्रावर दया करणे हे मानवधर्माला शोभणारे असे आहे. मुक्या प्राण्यांनादेखील जीव आहे ही जाणीव त्यांच्या अनेक दृष्टांतातून आपल्याला दिसून येते. 'पडाळीये गाइचा' दृष्टांतात गाईवर उपकार करणारा शेतकरी आपल्याला दिसून येतो. त्याचबरोबर 'झाडीलिया पुसलिया पशुचा' दृष्टांतात,῾῾पशु असेः ते झाडीजे पुसिजे तर साउमे ये वर मान घालीः ना थैक म्हणीजे तर परते जाए||"[xiv] माणसाप्रमाणेच प्राणीदेखील प्रेमाचे भुकेले आहेत. पशुला प्रेमाने हाताळले, त्याच्या पाठीवरुन हात फिरवला, लळा लावला तर ते जवळ येते, मान वर करते, अन् त्याला मारहाण केली, हाकलले तर ते दूर जाते.

सूत्रपाठ आणि दृष्टांतपाठातून वैज्ञानिक दृष्टीकोन अधिक प्रमाणात दिसून येण्याचे कारण त्याकाळात संपूर्ण समाज अंधश्रध्देत बुडाला होता. कर्मकांडातून सुटका होण्यासाठी विज्ञानाची कास धरावी लागते. विज्ञाननिष्ठेतून समाजाला नविन दृष्टीकोन देण्याचे काम त्याकाळात महानुभाव संप्रदायाने केले आहे. दृष्टांतपाठातून ममत्व, प्रमाणिकपणा, सौजन्यशीलता त्याचबरोबर एकनिष्ठता इत्यादी मूल्यांचा आविष्कार होताना आपल्याला दिसतो आहे. त्याकाळातील मूल्याची मुहूर्तमेढ दृष्टांतपाठाच्या माध्यमातून होताना आपल्याला दिसते. सूत्रपाठाचे मूर्त रूप आपल्याला दृष्टांतपाठात दिसून येते. कर्मकांडात अडकलेल्या संपूर्ण समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न महानुभाव पंथाच्या माध्यमातून करण्यात आला. पुरुषाप्रमाणेच स्त्रीला देखील धर्मसाधनेचा अधिकार मिळवून देणारा पहिला भक्तीसंप्रदाय म्हणून या महानुभाव संप्रदायाला महत्वाचे स्थान मध्ययुगात महत्वाचे आहे.

**संदर्भ :-**

[i] मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड पहिला), संपा.शं.गो.तुळपुळे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे नवे पुनर्मुद्रण २००५,पृष्ठ क्र १८८.
[ii] केशिराज व्यास: व्यक्ती आणि वाङ्मय, रमेश आवलगावकर, आवृत्ती पहिली, पृष्ठ क्र.८३
[iii] श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ, ह.ना.नेने, अरूण प्रकाशन , पृ.क्र३९
[iv] मराठी वाङ्मयाचा इतिहास. तत्रैव पृष्ठ क्र.२९१
[v] तत्रैव पृष्ठ क्र.२९५
[vi] तत्रैव
[vii] तत्रैव
[viii] तत्रैव पृष्ठ क्र.२९७
[ix] दृष्टांतपाठ, संपा. प्रा.सुशीला सोलापुरे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००४ पृ.५३
[x] तत्रैव पृ.५८
[xi] तत्रैव पृ.६१
[xii] तत्रैव पृ.५३
[xiii] तत्रैव पृ.७०
[xiv] तत्रैव पृ.७५